## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक २९/२०१९ मधील

## निशाण ३७ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

२. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे निशाण ३७ वरील अर्जात कथन केले आहे की, त्यांना कैफियत देण्याची आहे. परंतु, दावा समन्स बजावणी होऊनही प्रतिवादी क्र. १ हा मुंबई येथे नोकरीस असल्याने व प्रतिवादी क्र. २ व ३ वयस्कर असल्याने वकिलांना भेटून माहिती व कागदपत्रे पुरविता आली नाहीत व त्यानंतर कोरोनाच्या साथीमुळे लॉकडाऊन झाल्याने त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही व त्यामुळे त्यांचेविरुद्ध एकतर्फा आदेश झाला आहे. त्यामुळे, न्याय पूर्ततेच्या दृष्टीने झालेला विलंब माफ करुन एकतर्फा आदेश रद्दबातल होऊन कैफियत दाखल करुन घेण्यात यावी, असे प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे कथन आहे.

४. वादीने निशाणी ४१ येथे म्हणणे देऊन अर्जास विरोध केला व कथन केले की, प्रतिवादींनी दावा समन्स बजाऊन घेण्यास टाळाटाळ केली असल्याने त्यांना जाहीर नोटीसीने बजावणी करण्यात आली आहे. प्रतिवादींविरुद्ध एकतर्फा आदेश झाल्यानंतर प्रतिवादी अनेकदा लांजा येथे आले होते. वादीचा निशाणी ६ येथील तूर्तातूर्त ताकीदीचा अर्ज मंजूर झाला आहे. प्रस्तुत अर्ज १८ महिन्यांनी दाखल केला आहे व तो प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी केलेला नाही. अर्जात दिलेले विलंबाचे कारण खोडसाळ असल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा असे वादीचे कथन आहे.

५. अभिलेखानुसार प्रतिवादी क्र. १ व ३ यांचेवर दावा समन्सची बजावणी करण्यासाठी वादीने वारंवार तजवीज करूनही नियमित बजावणी न झाल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० नुसार त्यांच्या घराच्या दर्शनी भागास समन्स चिकटऊन व वृत्तपत्रात जाहीर नोटीस देऊन (निशाणी २१ व २५) समन्सची बजावणी झालेली आहे. त्यानंतरही प्रतिवादी क्र. १ व ३ हजर न झाल्याने दिनांक २०/०९/२०१९ रोजी त्यांचेविरुद्ध नि. १ वर एकतर्फा आदेश झाला आहे. प्रतिवादी क्र. २ ला दावा समन्सची नियमित बजावणी होऊनही ती गैरहजर राहिल्याने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी त्यांचेविरुद्ध नि. १ वर एकतर्फा आदेश झाला आहे.

६. माहे मार्च २०२० पासून कोरोना रोगाच्या साथीमुळे न्यायालयाचे कामकाज नियमितपणे सुरु नव्हते ही वस्तुस्थिती आहे. न्यायालयाचे कामकाज नियमित सुरू

झाल्यावर सदर प्रतिवादींनी प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे. परंतु, माहे सप्टेंबर २०१९ ते माहे मार्च २०२० या कालावधीत कोरोना विषाणू संबंधित लॉकडाऊन नव्हता. प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे वय अनुक्रमे ६० वर्षे व ५० वर्षे आहे. प्रतिवादी क्र. १ व ३ यांना काढलेल्या नियमित समन्स व नोटीसचा बेलिफ अहवाल पाहाता घर बंद असल्याने व प्रतिवादी मुंबई येथे राहात असल्याचे सांगण्यात आल्याने समन्स व नोटीस न बजावता परत आली होती असे दिसून येते.

७. प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या एकट्याच्या सहीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. तथापि, या अर्जासोबत दाखल कैफियतीवर तिन्ही प्रतिवादींच्या सह्या आहेत. त्यामुळे दावा वाटपाचा असल्याने केवळ सदर तांत्रिक बाबीस्तव अर्ज फेटाळणे संयुक्तिक ठरणारे नाही. प्रतिवादी क्र. १ व ३ यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० नुसार समन्सची बजावणी झाली आहे या बाबीचा विचार करता व प्रतिवादी क्र .२ व ३ यांचे वय विचारात घेता त्यांना याकामी हजर होऊन कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित ठरणारे आहे. प्रस्तूत दावा अद्याप वादीचे निशाणी ३० येथील दावा दुरुस्ती अर्जाच्या चौकशीकामी प्रलंबित आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या स्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही. सबब, वादातील मुद्दयाचे एकाच वेळी गुणदोषांवर निराकरण होण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा प्रस्तूत अर्ज मंजूर करणे उचित ठरणारे आहे. परंतु, त्याचवेळी वादीने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना समन्स व नोटीस बजावणीसाठी वेळोवेळी केलेली तजवीज व त्यासाठी खर्च झालेला वेळ व पैसा यांचा विचार करता प्रतिवादींनी वादीला खर्च देण्याचा आदेश करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## <u>आ दे श</u>

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा निशाण ३७ येथील अर्ज, त्यांनी वादीला पुढील तारखेस रुपये १०००/– खर्च देण्याच्या अटीवर, मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येत आहे व त्यांना कैफियत सादर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**दिनांकः १२/०३/२०२१.** **(जी.एम.साधले)**

**ठिकाणः लांजा.** **दिवाणी न्यायाधीश क.स्त.,लांजा,**

**जि.रत्नागिरी.**

Digitally signed by
Girish Madhukar
Sadhale
Date: 2021.03.13
12:49:04 +0530